# प्रेसनोट

नाशिक,
दि. १५/०२/२०२४

**आरोपी रामनाथ उमाजी देवडे, ग्रामपंचायत सदस्य, चिंचोडी खु.बदापुर ग्रुप ग्रामपंचायत, ता.येवला, जि.नाशिक यांनी १५०००/- रुपये लाचेची रक्कम स्विकारल्याने त्यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध कायद्यान्वये कारवाई केले बाबत.**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक |
| गुन्हा नोंद क्रमांक | येवला शहर पोलीस स्टेशन, नाशिक शहर. गुरनं. ४३/२०२४ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ प्रमाणे |
| आरोपीचे नाव व कार्यालय | रामनाथ उमाजी देवडे, ग्रामपंचायत सदस्य, चिंचोडी खु.बदापुर ग्रुप ग्रामपंचायत, ता.येवला, जि.नाशिक |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | २००००/- रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | १५०००/- रुपये |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार हे जिल्हा परिषद शाळेचे शालेय समितीचे अध्यक्ष असुन जि.प.शाळा बदापुर यांस पीएम श्री निधीतुन ७.३० लक्ष रूपये मंजुर झालले असल्याने सदर निधीतुन शाळेत सुशोभीकरण व परसबाग चे काम चालु असुन आरोपी रामनाथ उमाजी देवडे, ग्रामपंचायत सदस्य, चिंचोडी खु.बदापुर ग्रुप ग्रामपंचायत, ता.येवला, जि.नाशिक यांनी ग्रामपंचायत सदस्य या नात्याने ग्रामपंचायत च्या माध्यमातुन सदर कामात अडथळा न आणण्याच्या मोबदल्यात तक्रारदार यांचे कडे २०,०००/-रुपयांची लाचेची मागणी केल्याने तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक कार्यालयात तक्रार दिली.<br>सदर तक्रारीवरुन ला.प्र.वि. नाशिक पथकाने पडताळणी करून सापळा आयोजित केला असता सापळा कारवाई दरम्यान आरोपी रामनाथ उमाजी देवडे, ग्रामपंचायत सदस्य, चिंचोडी खु.बदापुर ग्रुप ग्रामपंचायत, ता.येवला, जि.नाशिक यांनी तक्रारदार यांचे कडे २००००/- रुपये लाचेची मागणी केली व तडजोडअंती १५०००/- रू लाचेची मागणी करून सदर लाचेची रक्कम दि. १४.०२.२०२४ रोजी स्विकारल्याने त्यांना पकडण्यात आले असुन त्यांचेविरूद्ध येवला शहर पोलीस स्टेशन, नाशिक शहर. गुरनं. ४३/२०२४ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ प्रमाणे दि. १५.०२.२०२४ रोजी गुन्हा नोंदविण्यात आला आहे. |

लाचलुचपत विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्र, नाशिक येथे संपर्क करावा.


संपर्क पत्ता :- ला.प्र.वि. नाशिक परिक्षेत्र, नाशिक
संकेतस्थळ :- acbmaharashtra.gov.in
ई-मेल :- spacbnashik@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार :- acbmaharashtra.net
टोल फ्री क्रमांक :- १०६४
दुरध्वनी क्रमांक :- ०२५३-२५७५६२८, २५७८२३०
व्हॉट्स ॲपक्र :- ९९३०९९७७००


( नरेंद्र भा.पवार )
पोलीस उपअधीक्षक ( वाचक )
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्र, नाशिक